# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ३१८** **दिनांक :- १६/११/२०२१**

---

## रिक्षामध्ये प्रवासी म्हणुन बसुन जबरी चोरी करणाऱ्या ०२ आरोपीतास अटक करुन ०२ गुन्हे उघड - वालीव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी

वालीव पोलीस ठाण्याच्या हद्दीत हायवेवर दुखापत करुन जबरी चोरीचे प्रमाण वाढत असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन सहाय्यक पोलीस आयुक्त व प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शक सुचनाप्रमाणे वालीव गुन्हेप्रकटिकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळावरील बारकावे, तांत्रिक विश्लेषण, सि.सि.टी.व्ही फुटेज या अनुषंगाने तपास करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

वालीव पो.स्टे. गु.रजि.क्र. I ९०२/२०२१ भा.द.वि.सं कलम ३९४, ३४ गुन्हयातील फिर्यादी हे दिनांक २३/०८/२०२१ रोजी पहाटे ०५:०० वा चे सुमारास दोन अनोळखी प्रवाशी यांना मिरारोड पुर्व ते वसई असे मुंबई अहमदाबाद हायवरुन चिंचोटी ब्रिजच्या पुढे त्याचे रिक्षा मध्ये प्रवासी म्हणुन बसलेले घेवुन जात असताना मुंबई अहमदाबाद हायवे वरुन चिंचोटी ब्रिजच्या पुढे आले असता सदर दोन अनोळखी इसम यांनी फिर्यादीचे छातीवर ब्लेड मारुन किरकोळ दुखापत करुन जबरदस्तीने पॅन्टच्या खिश्यातुन मोबाईल व पैसे पळुन गेले होते. सदर आरोपीत यांचा गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक माहितीचे आधारे शोध घेऊन आरोपीत १) शेर-ए-रजॉ साजीद खान पठाण, वय – २३ वर्षे २) राहील साजीद खान पठाण, वय : २० वर्षे दोन्ही रा. रामवाडी, आशापुरी, नया यॉर्ड, बडोदा शहर, राज्य – गुजरात यांना अटक करुन आरोपीत यांचे कडुन वालीव पोलीस ठाण्यात दाखल असलेले जबरी चोरीचे २ गुन्हे उघड करुन १३,०००/- रुपये किंमतीचे दोन मोबाईल हस्तगत केले आहेत.

**वालीव पोलीस ठाण्याकडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहे.**

| अ.नं. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नंबर |
|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. ९०२/२०२१ भा.द.वि.स कलम ३९४,३४ |
| २ | वालीव पोलीस ठाणे | गुन्हा रजि.नं. ८६५/२०२१ भादविसं कलम ३९२,३४ |

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ-२ वसई, श्री. पंकज शिरसाट सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कैलास बर्वे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक वालीव पोलीस ठाणे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे, स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.उप.निरी. प्रशांत चव्हाण, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, योगेश देशमुख, पो.ना. किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतिष गांगुर्डे, राजेंद्र फड, पो.अंम. गजानन गरीबे यांनी केली आहे.

---------ooooo---------